## माजी विद्यार्थी संघटना

अहवाल

२०२१-२०२२

**माजी विद्यार्थी मेळावाः**

महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेच्यावतीने दि. ०१ मे २०२२ रोजी 'माजी विद्यार्थी मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा माजी विद्यार्थी संघटनेचे समन्वयक डॉ. राजेश देशपांडे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुरेश पवार व माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष मनोज झाडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मिलिंद माने यांनी केले. तर महाविद्यालयाच्या 'नॅक'च्या मूल्यांकनात माजी विद्यार्थी यांचे योगदान या विषयाची भूमिका डॉ. आर. आर. चौधरी यांनी मांडली.

याप्रसंगी माजी विद्यार्थी संघटनेकडून उपप्राचार्य डॉ.सुरेश पवार, प्रा. डॉ. मिलिंद माने, प्रा. डॉ. सुमेध धनविज व प्रा. आनंद इंगोले यांचा आचार्य पदवी प्राप्त झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सोबतच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातून उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून पुरस्कार मिळविणारा माजी विद्यार्थी निलेश बोबडे याचाही सत्कार करण्यात आला.

मेळाव्याला उपस्थित माजी विद्यार्थी आशिष गांडोळे व सारिका किरडे यांनी मनोगत व्यक्त करून जुन्या आठवणींना उजाळा दिला. याप्रसंगी माजी विद्यार्थी संघटनेच्या नवनियुक्त कार्यकारणीची घोषणा करण्यात आली. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. आनंद इंगोले यांनी केले. तर आभार माजी विद्यार्थी निलेश बोबडे याने मानले कार्यक्रमाला माजी विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**माजी विद्यार्थी प्रतिसाद (Feedback) :**

महाविद्यालयाच्या विकासाच्या दृष्टीने महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा सत्र २०२१ – २२ मध्ये माजी विद्यार्थी प्रतिसाद (Feedback) दि. ०८.०५.२०२२ ते २३.०५.२०२२ या कालावधीत घेण्यात आला. ऑनलाइन पद्धतीने 'गुगल फॉर्म'च्या स्वरूपातून घेण्यात आलेल्या या प्रतिसादात विद्यार्थ्यांना एका प्रश्नावलीच्या माध्यमातून महाविद्यालयातील उपलब्ध अभ्यासक्रम, महाविद्यालयातील सोयी-सुविधा तसेच महाविद्यालयाच्या विकासाच्या संदर्भात त्यांची मते मागविण्यात आली. यात एकूण ८७ विद्यार्थ्यांनी आपला प्रतिसाद नोंदविला.

डॉ. राजेश देशपांडे
समन्वयक

डॉ. पुरुषोत्तम कालभूत
प्राचार्य
श्रीकृष्णदास जाजू
ग्रामीण सेवा महाविद्यालय
पिपरी, (वर्धा)

शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित,

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,

पिपरी, वर्धा – ४४२००१

संलग्न : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

स्थापना १५ जुलै १९६१

'नॅक' द्वारा मानांकित 'अ' श्रेणी

संकेतिक क्र :
वरिष्ठ महा. : ६५९
कनिष्ठमहा. : ०७.०१.००४

## सूचना

दि. ०५.०४.२०२२

महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटन समितीची सभा बुधवार, दि. ०६.०४.२०२२ रोजी दु. ०२.०० वा. मा. प्राचार्यांच्या कक्षात आयोजित करण्यात आली आहे. समितीच्या सर्व सदस्यांनी सभेला वेळेवर उपस्थित राहावे.

**विषय : माजी विद्यार्थी मेळावा आयोजनाबाबत चर्चा.**

**माजी विद्यार्थी समिती सदस्य :**

- डॉ. सुरेश पवार
- डॉ. मिलिंद माने
- प्रा. शिरीष सुतार
- प्रा. मनीष पांडे
- प्रा. संजय दुधबडे
- श्री. संजय सपाटे

**डॉ.राजेश देशपांडे**
समन्वयक

डॉ.पुरुषोत्तम कालभूत
प्राचार्य,
श्रीकृष्णदास जाजू
ग्रामीण सेवा महाविद्यालय
पिपरी, (वर्धा)

शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित,

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी–वर्धा

## 'माजी विद्यार्थी संघटना'

कार्यकारिणी

(2020-21 onwards)

| | | |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | – श्री. मनोज झाडे |
| २ | उपाध्यक्ष | – श्री. संदीप चिचाटे |
| ३ | सचिव | – श्री. आनंद इंगोले |
| ४ | सहसचिव | – कु. भारती कारंडे |
| ५ | कोषाध्यक्ष | – श्री. संजय सपाटे |
| ६ | सदस्य | – श्री. महेंद्र खडसे |
| ७ | सदस्य | – कु. संजीवनी वरफडे |
| ८ | सदस्य | – श्री. धीरज चौधरी |
| ९ | सदस्य | – कु. सारिका किरडे |
| १० | सदस्य | – श्री. राहुल राऊत |
| ११ | सदस्य | – कु. गौसिया शेख |
| १२ | मार्गदर्शक | – डॉ. पुरुषोत्तम कालभूत |
| १३ | मार्गदर्शक | – श्री. अरूण दाते |
| १४ | मार्गदर्शक | – डॉ. सुरेश पवार |
| १५ | मार्गदर्शक | – प्रा. मिलिंद माने |
| १६ | मार्गदर्शक | – प्रा. शिरीष सुतार |
| १७ | मार्गदर्शक | – प्रा. मनीष पांडे |
| १८ | मार्गदर्शक | – प्रा. संजय दुधबडे |
| १९ | निमंत्रित | – डॉ. रतन चौधरी (IQAC Coordinator) |
| २० | समन्वयक | – डॉ. राजेश देशपांडे |

S.J.G.S. MAHAVIDYALAYA Pipri Wardha

PRINCIPAL
Shrikrishnadas Jajoo
Grameen Seva Mahavidyalaya
PIPRI (WARDHA)

शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित,

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,

पिपरी, वर्धा – ४४२००१

संलग्न : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

'नॅक' द्वारा मानांकित 'अ' श्रेणी

स्थापना १५ जुलै १९६१

संकेतिक क्र :
वरिष्ठ महा. : ६५९
कनिष्ठमहा. : ०७.०१.००४

दि. ०६.०५.२०२२

प्रति,
मा. जिल्हा वार्ताहर,
दै. ...................................
...........................................

पुढील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रकाशित करून उपकृत करावे, ही विनंती.

धन्यवाद!

आपला विनीत,

For प्राचार्य,
श्रीकृष्णदास जाजू
ग्रामीण सेवा महाविद्यालय
पिपरी, (वर्धा)

.......................................................................................................

## 'कर्तृत्ववान माजी विद्यार्थी हा महाविद्यालयाचा अमूल्य ठेवा'

— डॉ. राजेश देशपांडे

### जाजू महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांनी दिला आठवणींना उजाला

वर्धा:— ''महाविद्यालयातून शैक्षणिक ज्ञान प्राप्त केल्यावर विविध क्षेत्रात आपल्या ज्ञानाच्या व कर्तृत्वाच्या बळावर यशोशिखरे गाठणाऱ्या आपल्या विद्यार्थ्यांविषयी महाविद्यालयाला सदैव अभिमान वाटतो. असे कर्तृत्ववान माजी विद्यार्थी महाविद्यालयाचा अमूल्य ठेवा असतात'' असे प्रतिपादन कार्यकारी प्राचार्य डॉ. राजेश देशपांडे यांनी केले.

शिक्षा मंडल, द्वारा संचालित श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय पिपरी–वर्धा येथील माजी विद्यार्थी संघटनेच्यावतीने 'माजी विद्यार्थी मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा माजी विद्यार्थी संघटनेचे समन्वयक म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुरेश पवार व माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष मनोज झाडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. देशपांडे म्हणाले की, ''विद्यार्थी आपल्या पुढील जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडत असले तरी त्यांचे ऋणानुबंध महाविद्यालयाशी कायम असतात. भविष्यातील वाटचाल करताना यशस्वी होण्यासाठी 'प्रेयसा'च्या मोहात न पडता 'श्रेयसा'चा पाठलाग करावा,'' असा मौलिक सल्लाही त्यांनी दिला. उपप्राचार्य डॉ. सुरेश पवार यांनी,''या महाविद्यालयात येणारा विद्यार्थी हा ग्रामीण भागातून येणारा आहे. त्यामुळे त्यांच्या परिस्थितीची जाणीव ठेऊन महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक विद्यार्थी घडविण्यावर भर देत असतात. संस्काराची शिदोरी त्यांच्या सोबत दिली जाते. तीच शिदोरी विद्यार्थ्यांच्या यशस्वी जीवनाचा आधार ठरते'' असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मिलिंद माने यांनी केले. तर महाविद्यालयाच्या 'नॅक'च्या मूल्यांकनात माजी विद्यार्थी यांचे योगदान या विषयाची भूमिका डॉ. आर. आर. चौधरी यांनी मांडली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मातृसंस्थेचे अध्यक्ष स्व. राहुलजी बजाज तसेच माजी प्राचार्य स्व. राम घाटे, सेवानिवृत्त प्राध्यापक स्व. के. पी. दीक्षित, स्व. बाबासाहेब तिजारे, स्व. अजय किनखेडकर तसेच काही माजी विद्यार्थी यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना मौन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

याप्रसंगी माजी विद्यार्थी संघटनेकडून उपप्राचार्य डॉ.सुरेश पवार, प्रा. डॉ.मिलिंद माने, प्रा. डॉ. सुमेध धनविज व प्रा. आनंद इंगोले यांचा आचार्य पदवी प्राप्त झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सोबतच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातून उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून पुरस्कार मिळविणारा माजी विद्यार्थी निलेश बोबडे याचाही सत्कार करण्यात आला.

मेळाव्याला उपस्थित माजी विद्यार्थी आशिष गांडोळे व सारिका किरडे यांनी मनोगत व्यक्त करून जुन्या आठवणींना उजाळा दिला. याप्रसंगी माजी विद्यार्थी संघटनेच्या नवनियुक्त कार्यकारणीची घोषणा करण्यात आली. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. आनंद इंगोले यांनी केले. तर आभार माजी विद्यार्थी निलेश बोबडे याने मानले कार्यक्रमाला माजी विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

#### अध्यक्षांनी केली पुरस्कारांची घोषणा

'आम्ही महाविद्यालयात शिक्षण घेत असताना अनुभवलेल्या अडचणी सध्या शिक्षण घेत असलेल्या आमच्या भावंडांच्या वाटयाला येऊ नये म्हणून माजी विद्यार्थी संघटना पूर्णपणे प्रयत्न करेल, असा विश्वास संघटनेचे अध्यक्ष मनोज

झाडे यांनी दिला. यासोबतच महाविद्यालयामध्ये दरवर्षी प्रत्येक वर्गात 'गुणवंत' ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच इतर क्षेत्रात महाविद्यालयाचे नावलौकिक करणाऱ्याना विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थी संघटनेद्वारा रोख पारितोषिक देण्याची घोषणाही त्यांनी केली. शिवाय माजी विद्यार्थ्यांच्या अनुभवांचा लाभ माजी विद्यार्थ्यांच्या रोजगार निर्मितीकरिता करून देण्यासाठी विविध शिबिर व चर्चासत्र आयोजित करणार असल्याचे सांगितले.

शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी, वर्धा – ४४२ ००१

संलग्न : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर
**नॅक द्वारा पुनर्मानांकित 'अ' श्रेणी**

संकेतिक क्र :
वरिष्ठ महा. : ६५९
कनिष्ठ महा. : ०७.०१.००४

स्थापना १५ जुलै १९६१

जावक क्र. : श्रीजाग्रासेम/२०२२–२३

दिनांक २९.०४.२०२२

# सूचना

महाविद्यालयाच्या सर्व सहकारी प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचारीवृंदांना सूचित करण्यात येते की, रविवार दिनांक १ मे २०२२ रोजी महाविद्यालयात 'माजी विद्यार्थी मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. तरी सर्वांनी सकाळी ८.३० वाजता कार्यक्रमाला वेळेवर उपस्थित राहावे.

For प्राचार्य

प्राचार्य,
श्रीकृष्णदास जाजू
ग्रामीण सेवा महाविद्यालय
पिपरी, (वर्धा)

दूरध्वनी– कार्यालय : ०७१५२ – २३०५१८ / २३०११० फॅक्स नं. : ०७१५२ –२३०५१८
Website : www.sjgsm.shikshamandal.org Email : sjgs_pw@rediffmail.com, sjgsm@smw.org.in

# SHRIKRISHNADAS JAJOO GRAMEEN SEVA MAHAVIDYALAYA, PIPRI- WARDHA.

## STAFF LIST (SENIOR COLLEGE) मराठी विद्यार्थी मंडळ

**TEACHING STAFF**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Dr. P. M. Kalbhut | Principal | |
| 2. | Dr. R. K. Moon | Asso. Professor | |
| 3. | Dr. S. M. Pawar | Assist. Professor | |
| 4. | Shri. M. T. Mane | Assist. Professor | |
| 5. | Dr. R. R. Deshpande | Asso. Professor | |
| 6. | Shri. S. M. Sutar | Assist. Professor | |
| 7. | Dr. S. S. Chauhan | Director of Phy.Edu. | |
| 8. | Dr. V. R. Ugale | Librarian | |
| 9. | Dr. R. R. Chaudhari | Assist. Professor | |
| 10. | A.B Waranje | P. T. Lect. | |
| 11. | Dr. A. N. Ingole | P. T. Lect. | |
| 12. | | P. T. Lect. | |
| 13. | | P. T. Lect. | |

**NON-TEACHING STAFF**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Smt. R. M. Patil | Head Clerk | |
| 2. | Ku. S. P. Mokadam | Senior Clerk | |
| 3. | Shri. S. S. Ingole | Lib. Attend. | |

(1) K. M. Walghade

(2) [illegible] इरपाते

(3) संदिप मा. [illegible]

(4) मधुकर जु. डांगरकर

SHRIKRISHNADAS JAJOO GRAMEEN SEVA MAHAVDYALAYA, PIPRI-WARDHA.

## STAFF LIST (JUNIOR COLEGE)

### TEACHING STAFF (J.C)

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Shri. M.S. Pande | Lecturer | .............. |
| 2. | Shri. P.B. Bais | Lecturer | .............. |
| 3. | Shri. M. G. Yeltiwar | Lecturer | .............. |
| 4. | Shri. G. H. Upase | Lecturer | .............. |
| 5. | Ku. B. G. Samuel | Lecturer | .............. |
| 6. | Ku. S. K. Warfade | Shikshan Sevak | .............. |
| 7. | Shri. S. P. Dhanvij | Shikshan Sevak | .............. |
| 8. | | | .............. |

### NON-TEACHING STAFF (J.C.)

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Shri. S.M. Sapate | Lab. Asstt. | .............. |

### TEACHING STAFF (MCVC)

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Shri. S.G. Jambhulkar | FTT | .............. |
| 2. | Shri. S.I. Mohammad | FTT | .............. |
| 3. | Shri. S.V. Mahajan | FTT | .............. |
| 4. | Shri. R.G. Warkal | FTT (Prac.) | .............. |
| 5. | Shri. S.N. Dudhabade | FTT (Prac.) | .............. |
| 6. | .............. | P.T. Lect. | .............. |
| 7. | .............. | P.T. Lect. | .............. |
| 8. | .............. | P.T. Lect. | .............. |

### NON-TEACHING STAFF (MCVC)

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Shri. S. A. Alwadkar | Clerk | .............. |

शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित,

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी-वर्धा

## 'माजी विद्यार्थी संघटना'

## (Alumni Association)

---

- निमंत्रण -

प्रति,

महोदय/महोदया,

स. न. वि. वि.

रविवार, दि. ०१ मे २०२२ रोजी सकाळी ०८.३० वा. आपल्या महाविद्यालयात 'माजी विद्यार्थी मेळावा' आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्याला आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

धन्यवाद!

विनित

समन्वयक
माजी विद्यार्थी संघटना

प्राचार्य
श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिपरी-वर्धा

## माजी विद्यार्थी प्रतिसाद

२०२१–२२

| विधान | होय | | नाही | |
|---|---|---|---|---|
| | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % |
| श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालयात शिक्षण घेतल्याचा आपल्याला अभिमान वाटतो का? | 87 | 100 | 00 | 00 |
| आपल्या या विकासामध्ये महाविद्यालयाची भूमिका महत्त्वाची वाटते का? | 87 | 100 | 00 | 00 |
| तुम्ही शिकलेला अभ्यासक्रम हा वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्य जोपासणारा आहे का? | 87 | 100 | 00 | 00 |
| तुम्ही शिकलेल्या अभ्यासक्रमातून रोजगाराची उद्दिष्टे साध्य होतात का? | 83 | 94.4 | 04 | 4.6 |
| अभ्यासक्रमानुसार आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधा महाविद्यालयामध्ये उपलब्ध आहेत का? | 87 | 100 | 00 | 00 |
| प्राध्यापक/शिक्षक सक्रियपणे आपापल्या विषयातील संकल्पना समजावून देतात का? | 87 | 100 | 00 | 00 |
| महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून महाविद्यालयाच्या भावी विकासात आपण योगदान देऊ शकता का? | 87 | 100 | 00 | 00 |

| | उत्तम | | चांगला | | समाधानकारक | | सर्वसाधारण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % |
| महाविद्यालयाच्या परिसराबाबत आपला अभिप्राय | 50 | 57.5 | 26 | 29.9 | 10 | 11.5 | 01 | 1.1 |
| महाविद्यालयातील प्रशासकीय सेवेबाबत आपला अभिप्राय | 53 | 60.9 | 28 | 32.2 | 05 | 5.7 | 01 | 1.1 |
| महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील सुविधेबाबत आपला अभिप्राय | 61 | 70.1 | 22 | 25.3 | 03 | 3.4 | 01 | 1.1 |
| महाविद्यालयातील क्रीडासुविधेबाबत आपला अभिप्राय | 58 | 66.7 | 18 | 20.7 | 10 | 11.5 | 01 | 1.1 |
| महाविद्यालयातील वर्गखोल्या, इमारत व इतर पायाभूतसुविधा याबाबत आपला अभिप्राय | 61 | 70.1 | 22 | 25.3 | 04 | 4.6 | 00 | 00 |
| महाविद्यालयातील प्रवेशप्रक्रियेबाबत आपला अभिप्राय | 63 | 72.4 | 22 | 25.3 | 02 | 2.3 | 00 | 00 |
| महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबत आपला अभिप्राय | 68 | 78.2 | 19 | 21.8 | 00 | 00 | 00 | 00 |
| महाविद्यालयाचा एकंदरीत दर्जा | 62 | 71.3 | 23 | 26.4 | 02 | 2.3 | 00 | 00 |

| | शैक्षणिक | | सामाजिक | | आर्थिक | | सांस्कृतिक | | इतर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % |
| महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून महाविद्यालयाच्या भावी विकासात आपण कोणत्या प्रकारचे योगदान देऊ शकता?* | 39 | 44.8 | 53 | 60.9 | 19 | 21.8 | 26 | 29.9 | 35 | 40.2 |

** (Tick all that apply)*

डॉ. राजेश देशपांडे
समन्वयक

डॉ. पुरुषोत्तम कालभूत
प्राचार्य,
श्रीकृष्णदास जाजू
ग्रामीण सेवा महाविद्यालय
पिपरी, (वर्धा)

## श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी – वर्धा

## माजी विद्यार्थी प्रतिसाद

## २०२१–२२

## विश्लेषणात्मक अहवाल

महाविद्यालयाच्या विकासाच्या दृष्टीने महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा सत्र २०२१ – २२ मध्ये प्रतिसाद दि. ०८.०५.२०२२ ते २३.०५.२०२२ या कालावधीत घेण्यात आला. ऑनलाइन पद्धतीने 'गुगल फॉर्म'च्या स्वरूपातून घेण्यात आलेल्या या प्रतिसादात विद्यार्थ्यांना एका प्रश्नावलीच्या माध्यमातून महाविद्यालयातील उपलब्ध अभ्यासक्रम, महाविद्यालयातील सोयी-सुविधा तसेच महाविद्यालयाच्या विकासाच्या संदर्भात त्यांची मते मागविण्यात आली. यात एकूण ८७ विद्यार्थ्यांनी आपला प्रतिसाद नोंदविला. माजी विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादाचा विश्लेषणात्मक अहवाल पुढील प्रमाणे आहे

**१ महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण :**

महाविद्यालय शिक्षण घेतल्याचा आपल्याला अभिमान वाटतो का? या प्रश्नाच्या उत्तरात १०० टक्के विद्यार्थ्यांनी त्याबद्दल 'होय' असा प्रतिसाद दिला.

**२ विद्यार्थ्यांच्या विकासात महाविद्यालयाची भूमिका :**

१०० टक्के विद्यार्थ्यांना आपल्या विकासात महाविद्यालयाची भूमिका महत्वाची वाटते.

**३ वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व शैक्षणिक मूल्यांची जोपासना :**

प्राप्त प्रतिसादानुसार १०० टक्के विद्यार्थ्यांना महाविद्यालयात शिकवला जाणारा अभ्यासक्रम वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्य जोपासणारा आहे असे वाटते.

**४ अभ्यासक्रमाद्वारे रोजगाराची उद्दिष्टे:**

महाविद्यालयातील अभ्यासक्रमातून ९४.४ टक्के विद्यार्थ्यांना रोजगाराची उद्दिष्टे साध्य होतात असे वाटते, तर ४.६ टक्के विद्यार्थ्यांना ही उद्दिष्टे साध्य होत नाही असे वाटते.

**५ महाविद्यालयातील भौतिक सुविधा :**

अभ्यासक्रमानुसार आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधा महाविद्यालयांमध्ये उपलब्ध आहेत असे १०० टक्के विद्यार्थ्यांना वाटते.

**६ शिक्षण प्रक्रिया :**

महाविद्यालयातील अध्यापक सक्रियपणे आपापल्या विषयातील संकल्पना समजून देतात याबद्दल १०० टक्के विद्यार्थ्यांनी सहमती दर्शवली आहे.

**७ महाविद्यालयाचा परिसर :**

महाविद्यालयाच्या परिसराबाबत ५७.५ टक्के विद्यार्थ्यांनी परिसर उत्तम असल्याचे मत नोंदविले, २९.९ टक्के विद्यार्थ्यांनी परिसर चांगला असल्याचे सांगितले, ११.५ टक्के विद्यार्थ्यांनी परिसर समाधानकारक व ०१.१ टक्के विद्यार्थ्यांनी सर्वसाधारण असल्याचे नमूद केले.

**८ महाविद्यालयातील प्रशासकीय सेवा :**

महाविद्यालयातील प्रशासकीय सेवेबाबत ६०.९ टक्के विद्यार्थ्यांनी प्रशासकीय सेवा उत्तम, ३२.२ टक्के विद्यार्थ्यांनी चांगली, ०५.७ टक्के विद्यार्थ्यांनी समाधानकारक तर ०१.१ टक्के विद्यार्थ्यांनी सर्वसाधारण असल्याचे नमूद केले.

**९ महाविद्यालयातील ग्रंथालय :**

महाविद्यालयाच्या ग्रंथालय सुविधेबाबत ७०.१ टक्के विद्यार्थ्यांना ग्रंथालय सुविधा उत्तम, २५.३ टक्के विद्यार्थ्यांना चांगली, ०३.४ टक्के विद्यार्थ्यांना समाधानकारक व ०१.१ टक्के विद्यार्थ्यांना सर्वसाधारण आहे असे वाटते.

**१० महाविद्यालयातील क्रीडा सुविधा :**

महाविद्यालयातील क्रीडा सुविधेबाबत ६६.७ टक्के विद्यार्थ्यांनी उत्तम, २०.७ टक्के विद्यार्थ्यांनी चांगली, ११.५ टक्के विद्यार्थ्यांनी समाधानकारक व ०१.१ टक्के विद्यार्थ्यांनी सर्वसाधारण असल्याचे मत नोंदवले

**११ वर्गखोल्या, इमारत व पायाभूत सुविधा :**

महाविद्यालयातील वर्गखोल्या, महाविद्यालयाची इमारत व इतर पायाभूत सुविधा ७०.१ टक्के विद्यार्थ्यांनी उत्तम, २५.३ टक्के विद्यार्थ्यांनी चांगली व ०४.६ टक्के विद्यार्थ्यांनी समाधानकारक असल्याचे मत नोंदविले.

**१२ प्रवेश प्रक्रिया :**

महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया उत्तम असल्याचे मत ७२.४ टक्के विद्यार्थ्यांनी नोंदवले, २५.३ टक्के विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियापद्धत चांगली व ०२.३ टक्के विद्यार्थ्यांनी समाधानकारक असल्याचे मत नोंदविले.

**१३ महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता :**

महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता ७८.२ टक्के विद्यार्थ्यांनी उत्तम असल्याचे वाटते तर २१.८ टक्के विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा चांगला असल्याचे मत नोंदविले.

**१४ महाविद्यालयाचा एकंदरीत दर्जा :**

एक शिक्षण संस्था म्हणून महाविद्यालयाचा एकंदरीत दर्जा उत्तम आहे आहे असे ७१.३ टक्के विद्यार्थ्यांनी नमूद केले, २६.४ टक्के विद्यार्थ्यांनी दर्जा चांगला, तर ०२.३ टक्के विद्यार्थ्यांनी समाधानकारक असल्याबद्दल मत नोंदविले

**१५ महाविद्यालयाच्या विकासात माजी विद्यार्थ्यांचे योगदान :**

महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून महाविद्यालयाच्या भावी विकासात योगदान देण्याची तयारी १०० टक्के विद्यार्थ्यांनी दर्शवली त्यात ४४.८ टक्के विद्यार्थ्यांनी शैक्षणिक, ६०.९ टक्के विद्यार्थ्यांनी सामाजिक, २१.८ टक्के विद्यार्थ्यांनी आर्थिक, २९.९ टक्के विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक व ४०.२ टक्के विद्यार्थ्यांनी आवश्यक असेल त्या इतर बाबींमध्ये योगदान देण्याबाबत सहमती दर्शविली.

**१६ महाविद्यालयाच्या भावी विकासाबाबत सूचना :**

महाविद्यालयाच्या भावी विकासाच्या दृष्टीने २४ टक्के विद्यार्थ्यांनी विविध सूचना केल्या तर ७६ टक्के विद्यार्थ्यांनी कोणत्याही सूचना केल्या नाहीत.

**डॉ. राजेश देशपांडे**
समन्वयक

**डॉ. पुरुषोत्तम कालभूत**
प्राचार्य,
श्रीकृष्णदास जाजू
ग्रामीण सेवा महाविद्यालय
पिपरी, (वर्धा)

# माजी विद्यार्थी प्रतिसाद
## २०२०–२१

| विधान | होय | | नाही | |
|---|---|---|---|---|
| | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % |
| श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालयात शिक्षण घेतल्याचा आपल्याला अभिमान वाटतो का? | 93 | 100 | 00 | 00 |
| आपल्या या विकासामध्ये महाविद्यालयाची भूमिका महत्त्वाची वाटते का? | 93 | 100 | 00 | 00 |
| तुम्ही शिकलेला अभ्यासक्रम हा वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्य जोपासणारा आहे का? | 93 | 100 | 00 | 00 |
| तुम्ही शिकलेल्या अभ्यासक्रमातून रोजगाराची उद्दिष्टे साध्य होतात का? | 85 | 91.4 | 08 | 8.6 |
| अभ्यासक्रमानुसार आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधा महाविद्यालयामध्ये उपलब्ध आहेत का? | 88 | 94.6 | 05 | 5.4 |
| प्राध्यापक/शिक्षक सक्रियपणे आपापल्या विषयातील संकल्पना समजावून देतात का? | 92 | 98.9 | 01 | 1.1 |
| महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून महाविद्यालयाच्या भावी विकासात आपण योगदान देऊ शकता का? | 93 | 100 | 00 | 00 |

| | उत्तम | | चांगला | | समाधानकारक | | सर्वसाधारण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % |
| महाविद्यालयाच्या परिसराबाबत आपला अभिप्राय | 59 | 63.4 | 29 | 31.2 | 05 | 5.4 | 00 | 00 |
| महाविद्यालयातील प्रशासकीय सेवेबाबत आपला अभिप्राय | 53 | 57 | 31 | 33.3 | 07 | 7.5 | 02 | 2.2 |
| महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील सुविधेबाबत आपला अभिप्राय | 71 | 76.3 | 12 | 12.9 | 10 | 10.8 | 00 | 00 |
| महाविद्यालयातील क्रीडासुविधेबाबत आपला अभिप्राय | 63 | 67.7 | 20 | 21.5 | 06 | 6.5 | 04 | 4.3 |
| महाविद्यालयातील वर्गखोल्या, इमारत व इतर पायाभूतसुविधा याबाबत आपला अभिप्राय | 53 | 57 | 34 | 36.6 | 06 | 6.5 | 00 | 00 |
| महाविद्यालयातील प्रवेशप्रक्रियेबाबत आपला अभिप्राय | 66 | 71 | 23 | 24.7 | 04 | 4.3 | 00 | 00 |
| महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबत आपला अभिप्राय | 74 | 79.6 | 17 | 18.3 | 02 | 2.2 | 00 | 00 |
| महाविद्यालयाचा एकंदरीत दर्जा | 68 | 73.1 | 24 | 25.8 | 01 | 1.1 | 00 | 00 |

| महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून महाविद्यालयाच्या भावी विकासात आपण कोणत्या प्रकारचे योगदान देऊ शकता?* | शैक्षणिक | | सामाजिक | | आर्थिक | | सांस्कृतिक | | इतर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % |
| * *(Tick all that apply)* | 46 | 49.5 | 55 | 59.1 | 16 | 17.2 | 24 | 25.8 | 35 | 37.6 |

डॉ. राजेश देशपांडे
समन्वयक

डॉ. पुरुषोत्तम कालभूत
प्राचार्य,
श्रीकृष्णदास जाजू
ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिंपरी (वर्धा)

**श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी – वर्धा**

**माजी विद्यार्थी प्रतिसाद**

**२०२०–२१**

**विश्लेषण अहवाल**

महाविद्यालयाच्या विकासाच्या दृष्टीने महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा सत्र २०२० – २१ मध्ये प्रतिसाद दि. २१.०५.२०२१ ते २७.०५.२०२१ या कालावधीत घेण्यात आला. ऑनलाइन पद्धतीने 'गुगल फॉर्म'च्या स्वरूपातून घेण्यात आलेल्या या प्रतिसादात विद्यार्थ्यांना एका प्रश्नावलीच्या माध्यमातून महाविद्यालयातील उपलब्ध अभ्यासक्रम, महाविद्यालयातील सोयी-सुविधा तसेच महाविद्यालयाच्या विकासाच्या संदर्भात त्यांची मते मागविण्यात आली. यात एकूण ९३ विद्यार्थ्यांनी आपला प्रतिसाद नोंदविला. माजी विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादाचा विश्लेषणात्मक अहवाल पुढील प्रमाणे आहे

**१ महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण :**

महाविद्यालय शिक्षण घेतल्याचा आपल्याला अभिमान वाटतो का? या प्रश्नाच्या उत्तरात १०० टक्के विद्यार्थ्यांनी त्याबद्दल 'होय' असा प्रतिसाद दिला.

**२ विद्यार्थ्यांच्या विकासात महाविद्यालयाची भूमिका :**

१०० टक्के विद्यार्थ्यांना आपल्या विकासात महाविद्यालयाची भूमिका महत्वाची वाटते.

**३ वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व शैक्षणिक मूल्यांची जोपासना :**

प्राप्त प्रतिसादानुसार १०० टक्के विद्यार्थ्यांना महाविद्यालयात शिकवला जाणारा अभ्यासक्रम वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्य जोपासणारा आहे असे वाटते.

**४ अभ्यासक्रमाद्वारे रोजगाराची उद्दिष्टे:**

महाविद्यालयातील अभ्यासक्रमातून ९१.४ टक्के विद्यार्थ्यांना रोजगाराची उद्दिष्टे साध्य होतात असे वाटते, तर ८.६ टक्के विद्यार्थ्यांना ही उद्दिष्टे साध्य होत नाही असे वाटते.

**५ महाविद्यालयातील भौतिक सुविधा :**

अभ्यासक्रमानुसार आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधा महाविद्यालयांमध्ये उपलब्ध आहेत असे ९४.६ टक्के विद्यार्थ्यांना वाटते तर ०५.४ टक्के विद्यार्थ्यांनी याबद्दल असहमती दर्शवली आहे.

**६ शिक्षण प्रक्रिया :**

महाविद्यालयातील अध्यापक सक्रियपणे आपापल्या विषयातील संकल्पना समजून देतात याबद्दल ९८.९ टक्के विद्यार्थ्यांनी सहमती दर्शवली आहे तर ०१.१ टक्के विद्यार्थ्यांनी याबद्दल असहमती दर्शवली आहे.

**७ महाविद्यालयाचा परिसर :**

महाविद्यालयाच्या परिसराबाबत ६३.४ टक्के विद्यार्थ्यांनी परिसर उत्तम असल्याचे मत नोंदविले, ३१.२ टक्के विद्यार्थ्यांनी परिसर चांगला असल्याचे सांगितले, ०५.४ टक्के विद्यार्थ्यांनी परिसर समाधानकारक असल्याचे नमूद केले.

**८ महाविद्यालयातील प्रशासकीय सेवा :**

महाविद्यालयातील प्रशासकीय सेवेबाबत ५७ टक्के विद्यार्थ्यांनी प्रशासकीय सेवा उत्तम, ३३.३ टक्के विद्यार्थ्यांनी चांगली, ०७.५ टक्के विद्यार्थ्यांनी समाधानकारक तर ०२.२ टक्के विद्यार्थ्यांनी सर्वसाधारण असल्याचे नमूद केले.

**९ महाविद्यालयातील ग्रंथालय :**

महाविद्यालयाच्या ग्रंथालय सुविधेबाबत ७६.३ टक्के विद्यार्थ्यांना ग्रंथालय सुविधा उत्तम, १२.९ टक्के विद्यार्थ्यांना चांगली व १०.८ टक्के विद्यार्थ्यांना समाधानकारक आहे असे वाटते.

**१० महाविद्यालयातील क्रीडा सुविधा :**

महाविद्यालयातील क्रीडा सुविधेबाबत ६७.७ टक्के विद्यार्थ्यांनी उत्तम, २१.५ टक्के विद्यार्थ्यांनी चांगली, ०६.५ टक्के विद्यार्थ्यांनी समाधानकारक व ०४.३ टक्के विद्यार्थ्यांनी सर्वसाधारण असल्याचे मत नोंदवले

**११ वर्गखोल्या, इमारत व पायाभूत सुविधा :**

महाविद्यालयातील वर्गखोल्या, महाविद्यालयाची इमारत व इतर पायाभूत सुविधा ५७ टक्के विद्यार्थ्यांनी उत्तम, ३६.५ टक्के विद्यार्थ्यांनी चांगली व ०६.५ टक्के विद्यार्थ्यांनी समाधानकारक असल्याचे मत नोंदविले.

**१२ प्रवेश प्रक्रिया :**

महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया उत्तम असल्याचे मत ७१ टक्के विद्यार्थ्यांनी नोंदवले, २४.७ टक्के विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियापद्धत चांगली व ०४.३ टक्के विद्यार्थ्यांनी समाधानकारक असल्याचे मत नोंदविले.

**१३ महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता :**

महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता ७९.५ टक्के विद्यार्थ्यांनी उत्तम असल्याचे वाटते तर १८.३ टक्के विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा चांगला असल्याचे सांगितले तर ०२.२ टक्के विद्यार्थ्यांनी समाधानकारक असल्याचे मत नोंदविले.

**१४ महाविद्यालयाचा एकंदरीत दर्जा :**

एक शिक्षण संस्था म्हणून महाविद्यालयाचा एकंदरीत दर्जा उत्तम आहे आहे असे ७३.१ टक्के विद्यार्थ्यांनी नमूद केले, २५.८ टक्के विद्यार्थ्यांनी दर्जा चांगला, तर ०१.१ टक्के विद्यार्थ्यांनी समाधानकारक असल्याबद्दल मत नोंदविले

**१५ महाविद्यालयाच्या विकासात माजी विद्यार्थ्यांचे योगदान :**

महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून महाविद्यालयाच्या भावी विकासात योगदान देण्याची तयारी १०० टक्के विद्यार्थ्यांनी दर्शवली त्यात ४९.५ टक्के विद्यार्थ्यांनी शैक्षणिक, ५९.१ टक्के विद्यार्थ्यांनी सामाजिक, १७.२ टक्के विद्यार्थ्यांनी आर्थिक, २५.८ टक्के विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक व ३७.६ टक्के विद्यार्थ्यांनी आवश्यक असेल त्या इतर बाबींमध्ये योगदान देण्याबाबत सहमती दर्शविली.

**१६ महाविद्यालयाच्या भावी विकासाबाबत सूचना :**

महाविद्यालयाच्या भावी विकासाच्या दृष्टीने ४० टक्के विद्यार्थ्यांनी विविध सूचना केल्या तर ६० टक्के विद्यार्थ्यांनी कोणत्याही सूचना केल्या नाहीत.

डॉ. राजेश देशपांडे
समन्वयक

डॉ. पुरुषोत्तम कालभूत
प्राचार्य,
श्रीकृष्णदास जाजू
ग्रामीण सेवा महाविद्यालय
पिपरी, (वर्धा)

# माजी विद्यार्थी प्रतिसाद
## २०१९–२०

| विधान | होय | | नाही | |
|---|---|---|---|---|
| | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % |
| श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालयात शिक्षण घेतल्याचा आपल्याला अभिमान वाटतो का? | 20 | 100 | 00 | 00 |
| आपल्या या विकासामध्ये महाविद्यालयाची भूमिका महत्त्वाची वाटते का? | 20 | 100 | 00 | 00 |
| तुम्ही शिकलेला अभ्यासक्रम हा वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्य जोपासणारा आहे का? | 20 | 100 | 00 | 00 |
| तुम्ही शिकलेल्या अभ्यासक्रमातून रोजगाराची उद्दिष्टे साध्य होतात का? | 18 | 90 | 02 | 10 |
| अभ्यासक्रमानुसार आवश्यक असणारी भौतिक सुविधा महाविद्यालयामध्ये उपलब्ध आहेत का? | 19 | 95 | 01 | 05 |
| प्राध्यापक/ शिक्षक सक्रियपणे आपापल्या विषयातील संकल्पना समजावून देतात का? | 20 | 100 | 00 | 00 |
| महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून महाविद्यालयाच्या भावी विकासात आपण योगदान देऊ शकता का? | 20 | 100 | 00 | 00 |

| | उत्तम | | चांगला | | समाधानकारक | | सर्वसाधारण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % |
| महाविद्यालयाच्या परिसराबाबत आपला अभिप्राय | 07 | 35 | 11 | 55 | 01 | 05 | 01 | 05 |
| महाविद्यालयातील प्रशासकीय सेवेबाबत आपला अभिप्राय | 12 | 60 | 04 | 20 | 04 | 20 | 00 | 00 |
| महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील सुविधेबाबत आपला अभिप्राय | 11 | 55 | 07 | 35 | 02 | 10 | 00 | 00 |
| महाविद्यालयातील क्रीडा सुविधेबाबत आपला अभिप्राय | 06 | 30 | 10 | 50 | 03 | 15 | 01 | 05 |
| महाविद्यालयातील वर्गखोल्या इमारत व इतर पायाभूत सुविधा याबाबत आपला अभिप्राय | 10 | 50 | 10 | 50 | 00 | 00 | 00 | 00 |
| महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रियेबाबत आपला अभिप्राय | 12 | 60 | 08 | 40 | 00 | 00 | 00 | 00 |
| महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबत आपला अभिप्राय | 15 | 75 | 05 | 25 | 00 | 00 | 00 | 00 |
| महाविद्यालयाचा एकंदरीत दर्जा | 13 | 65 | 07 | 35 | 00 | 00 | 00 | 00 |

| | शैक्षणिक | | सामाजिक | | आर्थिक | | सांस्कृतिक | | इतर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % | प्रतिसाद | % |
| महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून महाविद्यालयाच्या भावी विकासात आपण कोणत्या प्रकारचे योगदान देऊ शकता? *(Tick all that apply)* | 08 | 40 | 12 | 60 | 06 | 30 | 05 | 25 | 10 | 50 |

प्राचार्य,
श्रीकृष्णदास जाजू
ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिं.व री. (वर्धा)

डॉ. राजेश देशपांडे
समन्वयक

**श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी – वर्धा**
**माजी विद्यार्थी प्रतिसाद**
**२०१९–२०**
**विश्लेषण अहवाल**

महाविद्यालयाच्या विकासाच्या दृष्टीने महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा सत्र २०१९ – २० मध्ये प्रतिसाद घेण्यात आला. ऑनलाइन पद्धतीने 'गुगल फॉर्म'च्या स्वरूपातून घेण्यात आलेल्या या प्रतिसादात विद्यार्थ्यांना एका प्रश्नावलीच्या माध्यमातून महाविद्यालयातील उपलब्ध अभ्यासक्रम, महाविद्यालयातील सोयी-सुविधा तसेच महाविद्यालयाच्या विकासाच्या संदर्भात त्यांची मते मागविण्यात आली. यात एकूण २० विद्यार्थ्यांनी आपला प्रतिसाद नोंदविला. माजी विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादाचा विश्लेषणात्मक अहवाल पुढील प्रमाणे आहे

**१ महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण :**

महाविद्यालय शिक्षण घेतल्याचा आपल्याला अभिमान वाटतो का? या प्रश्नाच्या उत्तरात १०० टक्के विद्यार्थ्यांनी त्याबद्दल 'होय' असा प्रतिसाद दिला.

**२ विद्यार्थ्यांच्या विकासात महाविद्यालयाची भूमिका :**

१०० टक्के विद्यार्थ्यांना आपल्या विकासात महाविद्यालयाची भूमिका महत्वाची वाटते.

**३ वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व शैक्षणिक मूल्यांची जोपासना :**

प्राप्त प्रतिसादानुसार १०० टक्के विद्यार्थ्यांना महाविद्यालयात शिकवला जाणारा अभ्यासक्रम वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्य जोपासणारा आहे असे वाटते.

**४ अभ्यासक्रमाद्वारे रोजगाराची उद्दिष्टे:**

महाविद्यालयातील अभ्यासक्रमातून ९० टक्के विद्यार्थ्यांना रोजगाराची उद्दिष्टे साध्य होतात असे वाटते, तर १० टक्के विद्यार्थ्यांना ही उद्दिष्टे साध्य होत नाही असे वाटते.

**५ महाविद्यालयातील भौतिक सुविधा :**

अभ्यासक्रमानुसार आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधा महाविद्यालयांमध्ये उपलब्ध आहेत असे ९५ टक्के विद्यार्थ्यांना वाटते तर ०५ टक्के विद्यार्थ्यांनी याबद्दल असहमती दर्शवली आहे.

**६ शिक्षण प्रक्रिया :**

महाविद्यालयातील अध्यापक सक्रियपणे आपापल्या विषयातील संकल्पना समजून देतात याबद्दल १०० टक्के विद्यार्थ्यांनी सहमती दर्शवली आहे.

**७ महाविद्यालयाचा परिसर :**

महाविद्यालयाच्या परिसराबाबत ३५ टक्के विद्यार्थ्यांनी परिसर उत्तम असल्याचे मत नोंदविले, ५५ टक्के विद्यार्थ्यांनी परिसर चांगला असल्याचे सांगितले, ०५ टक्के विद्यार्थ्यांनी परिसर समाधानकारक तर ५७ टक्के विद्यार्थ्यांनी परिसर सर्वसाधारण असल्याचे नमूद केले.

**८ महाविद्यालयातील प्रशासकीय सेवा :**

महाविद्यालयातील प्रशासकीय सेवेबाबत ६० टक्के विद्यार्थ्यांनी प्रशासकीय सेवा उत्तम, २० टक्के विद्यार्थ्यांनी चांगली व २० टक्के विद्यार्थ्यांनी समाधानकारक असल्याचे मत नोंदविले.

**९ महाविद्यालयातील ग्रंथालय :**

महाविद्यालयाच्या ग्रंथालय सुविधेबाबत ५५ टक्के विद्यार्थ्यांना ग्रंथालय सुविधा उत्तम, ३५ टक्के विद्यार्थ्यांना चांगली व १० टक्के विद्यार्थ्यांना समाधानकारक आहे असे वाटते.

शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित,

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय पिपरी वर्धा

## माजी विद्यार्थी प्रतिसादाद्वारा प्राप्त सूचना व कार्यवाही

सत्र २०२०–२१ मध्ये महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाच्या विकासाच्या दृष्टीने ऑनलाईन प्रतिसाद घेण्यात आला. या प्रतिसादातून माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या भावी विकासाच्या दृष्टीने काही महत्त्वाच्या सूचना केलेल्या होत्या. दिनांक 02/08/2021 रोजी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाची (IQAC) सभा घेण्यात आली त्या सभेत माजी विद्यार्थ्यांकडून प्राप्त सूचनांवर चर्चा करण्यात आली.

माजी विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या सूचना व त्यावर झालेली चर्चा याचा तपशील आपल्या माहितीकरिता देत आहे.

**सूचना :** महाविद्यालयात विद्यार्थ्यांकरिता स्पर्धा परीक्षा वर्ग सुरू करावे.

**चर्चा व कार्यवाही :** महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा विभागाद्वारा विद्यार्थ्यांकरिता विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी नियमित वर्ग घेतले जातात.

**सूचना :** नवीन व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करायला हवा.

**चर्चा व कार्यवाही :** महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी बहुसंख्य विद्यार्थी ग्रामीण क्षेत्रातील आहेत व महाविद्यालयात शिकविण्यात येणारा 'ग्रामीण सेवा अभ्यासक्रम' हा ग्रामीण क्षेत्राशी निगडीत असल्यामुळे विद्यार्थ्यांची ग्रामीण क्षेत्रात काम करण्यासाठी आवश्यक तेवढी तयारी करून घेण्यास सक्षम आहे; तरीही हा अभ्यासक्रम अधिकाधिक व्यवसायाभिमुख व रोजगाराभिमुख करण्याकरिता आवश्यक तेवढे प्रयत्न महाविद्यालयाद्वारा करण्यात येतील.

**सूचना :** आधुनिक शिक्षणपद्धती आणि सामुग्रीचा वापर करून शिक्षणाचा दर्जा वाढविण्यावर भर दिला पाहिजे.

**चर्चा व कार्यवाही :** महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शिकवण्याकरिता वर्गखोल्या आय. सी. टी. ने सुसज्य करण्यात आल्या आहेत. वर्गखोलीत प्रोजेक्टर व स्मार्ट बोर्डची व्यवस्था करण्यात आलेली आहे. शिक्षक आपल्या विषयाचे मार्गदर्शन करताना ऑडिओ-व्हिडिओ क्लिप्स, पी.पी.टी. यांचा उपयोग वर्गात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना करीत असतात. त्याचप्रमाणे महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे दरवर्षी विद्यार्थ्यांकरिता आय. सी. टी. कार्यशाळा घेतल्या जातात. काळाच्या मागणीनुसार महाविद्यालयातील अध्यापकवर्ग व सध्या शिक्षण घेत असलेले विद्यार्थी आय. सी. टी.चा यथायोग्य वापर करताना दिसतात.

**सूचना :** आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता निःशुल्क वस्तिगृहाची सोय उपलब्ध करायला पाहिजे.

**चर्चा व कार्यवाही :** महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता अत्यंत माफक दरात वसतिगृहाची सोय उपलब्ध करून दिली जाते.

**सूचना :** महाविद्यालयातील ग्रंथालयाची जागा वाढवावी.

**चर्चा व कार्यवाही :** महाविद्यालयात सुसज्ज ग्रंथालय असून पुरेसा वाचन कक्ष व प्रत्येक विषयाचे संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत.

**सूचना :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रवासासाठी अडचणी येतात त्या दूर करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

**चर्चा व कार्यवाही :** महाविद्यालयाद्वारा ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मासिक पास, बस थांबणे याबाबत आगार प्रमुख, एस. टी. महामंडळ, वर्धा यांचेशी वेळोवेळी पत्र व्यवहार करून विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविल्या जातात.

| | | |
|---|---|---|
| डॉ. राजेश देशपांडे<br>समन्वयक<br>माजी विद्यार्थी संघटन | डॉ. रतन चौधरी<br>समन्वयक<br>अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष | डॉ.पुरुषोत्तम कालभूत<br>प्राचार्य,<br>श्रीकृष्णदास जाजू<br>ग्रामीण सेवा महाविद्यालय<br>पिपरी, (वर्धा) |

शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित,

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय पिपरी वर्धा

## माजी विद्यार्थी प्रतिसादाद्वारा प्राप्त सूचना व कार्यवाही

सत्र २०२१–२२ मध्ये महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाच्या विकासाच्या दृष्टीने ऑनलाईन प्रतिसाद घेण्यात आला. या प्रतिसादातून माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या भावी विकासाच्या दृष्टीने काही महत्त्वाच्या सूचना केलेल्या होत्या. दिनांक 01/08/2022 रोजी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाची (IQAC) सभा घेण्यात आली त्या सभेत माजी विद्यार्थ्यांकडून प्राप्त सूचनांवर चर्चा करण्यात आली.

माजी विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या सूचना व त्यावर झालेली चर्चा याचा तपशील आपल्या माहितीकरिता देत आहे.

**सूचना :** रोजगार, स्वयंरोजगार या संदर्भात नियमित मार्गदर्शन व्हावे.

**चर्चा व कार्यवाही :** महाविद्यालयातील समुपदेशन कक्ष व स्पर्धा परीक्षा विभागाद्वारा प्रवेशित विद्यार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार या संदर्भात नियमित मार्गदर्शन करण्यात येते.

**सूचना :** महाविद्यालयात विद्यार्थ्यांकरिता मोफत स्पर्धा परीक्षा वर्ग सुरू करावे.

**चर्चा व कार्यवाही :** महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा विभागाद्वारा विद्यार्थ्यांकरिता विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी नियमित वर्ग घेतले जातात. याकरिता कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

**सूचना :** महाविद्यालय परिसरात झाडांची कमतरता आहे.

**चर्चा व कार्यवाही :** महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात येतो. महाविद्यालय परिसरात मुबलक प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| **डॉ. राजेश देशपांडे**<br>समन्वयक<br>माजी विद्यार्थी संघटन | **डॉ. रतन चौधरी**<br>समन्वयक<br>अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष | **डॉ.पुरुषोत्तम कालभूत**<br>प्राचार्य<br>श्रीकृष्णदास जाजू<br>ग्रामीण सेवा महाविद्यालय<br>पिपरी, (वर्धा) |

शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित,

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय पिपरी वर्धा

## माजी विद्यार्थी प्रतिसादाद्वारा प्राप्त सूचनांवरील कार्यवाही

सत्र २०१९–२० मध्ये महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाच्या विकासाच्या दृष्टीने ऑनलाईन प्रतिसाद घेण्यात आला. या प्रतिसादातून माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या भावी विकासाच्या दृष्टीने काही महत्त्वाच्या सूचना केलेल्या होत्या. दिनांक २८.१०.२०२० रोजी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाची (IQAC) सभा घेण्यात आली त्या सभेत माजी विद्यार्थ्यांकडून प्राप्त सूचनांवर चर्चा करण्यात आली.

माजी विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या सूचना व त्यावर झालेली चर्चा याचा तपशील आपल्या माहितीकरिता देत आहे.

**सूचना :** महाविद्यालयात विद्यार्थ्यांना महाराष्ट्र पोलीस भरतीकरिता मार्गदर्शन दिले जावे.
**चर्चा व कार्यवाही :** महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा विभागाद्वारा विद्यार्थ्यांकरिता विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी नियमित वर्ग घेतले जातात त्यात पोलीस भरतीबाबत मार्गदर्शन करण्यात येईल तसेच महाविद्यालयातील माजी विद्यार्थी – जे पोलिस दलात कार्यरत आहेत – त्यांची या कार्यात मदत घेण्यात येईल.

सूचना : नवीन व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करायला हवा.
चर्चा व कार्यवाही : महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी बहुसंख्य विद्यार्थी ग्रामीण क्षेत्रातील आहेत व महाविद्यालयात शिकविण्यात येणारा 'ग्रामीण सेवा अभ्यासक्रम' हा ग्रामीण क्षेत्राशी निगडीत असल्यामुळे विद्यार्थ्यांची ग्रामीण क्षेत्रात काम करण्यासाठी आवश्यक तेवढी तयारी करून घेण्यास सक्षम आहे; तरीही हा अभ्यासक्रम अधिकाधिक व्यवसायाभिमुख व रोजगाराभिमुख करण्याकरिता आवश्यक तेवढे प्रयत्न महाविद्यालयाद्वारा करण्यात येतील.

**सूचना :** आजचा अभ्यासक्रम डिजिटल पद्धतीने कसा शिकवता येईल यावर लक्ष द्यावे.
**चर्चा व कार्यवाही :** महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शिकवण्याकरिता वर्गखोल्या आय. सी. टी. ने सुसज्य करण्यात आल्या आहेत. वर्गखोलीत प्रोजेक्टर व स्मार्ट बोर्डची व्यवस्था करण्यात आलेली आहे. शिक्षक आपल्या विषयाचे मार्गदर्शन करताना ऑडिओ-व्हिडिओ क्लिप्स, पी.पी.टी. यांचा उपयोग वर्गात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना करीत असतात. त्याचप्रमाणे महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे दरवर्षी विद्यार्थ्यांकरिता आय. सी. टी. कार्यशाळा घेतल्या जातात. काळाच्या मागणीनुसार महाविद्यालयातील अध्यापकवर्ग व सध्या शिक्षण घेत असलेले विद्यार्थी आय. सी. टी.चा यथायोग्य वापर करताना दिसतात.

**सूचना :** विद्यार्थ्यांची स्टेज डेरिंग सभाधीटपणा वाढ्यावर काम झाले पाहिजे.
**चर्चा व कार्यवाही :** महाविद्यालयात नियमित शिकवण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण वाढीस लागावे, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यादृष्टीने महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग, क्रीडा विभाग, ग्रंथालय विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग नियमितपणे विविध उपक्रम राबवीत असतो. त्यासोबतच मराठी अभ्यास मंडळ, कृषी अभ्यास मंडळ, समाजशास्त्र अभ्यास मंडळ अशा विविध विषयांच्या अभ्यास मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकरिता वकृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, सखोल वाचन स्पर्धा इ. स्पर्धांचे नियमित आयोजन केले जाते. महाविद्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या अनेक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, आभारप्रदर्शन याची जबाबदारी विद्यार्थ्यांकडे सोपविण्यात येते. एवढेच नव्हे तर अनेक कार्यक्रमांचे आयोजनही विद्यार्थी स्वतः करतात याप्रकारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यादृष्टीने महाविद्यालय निरंतर प्रयत्न करीत असते.

**सूचना :** विद्यार्थ्यांच्या विचारांची देवाण-घेवाण व्हावी म्हणून विद्यार्थी कट्टा असावा.
**चर्चा व कार्यवाही :** विद्यार्थ्यांमध्ये अनेक प्रकारचे सुप्त गुण असतात. त्यांच्यातील या गुणांना योग्य संधी मिळावी व विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होता यावे म्हणून महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते व या उपक्रमांमध्ये विद्यार्थी उस्फूर्तपणे सहभागी होतात. सोबतच प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यांकरिता एक निर्मिती फलक लावण्यात आलेला आहे. विद्यार्थी आपले लेख, कविता किंवा त्यांच्या वाचनात आलेले काही चांगले विचार इतर सहपाठी विद्यार्थी मित्रांना कळावे म्हणून निर्मिती फलकावर लावण्याची सुविधा त्यांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सोबतच विद्यार्थी परिषदेच्या प्रतिनिधींची प्रत्येक महिन्याला सभा होऊन विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी सोडविण्याकरिता महाविद्यालय निश्चितपणे पुढाकार घेईल.

**सूचना :** माजी विद्यार्थ्यांची सर्वसाधारण सभा दरवर्षी घेण्यात यावी.
**चर्चा व कार्यवाही :** महाविद्यालय दरवर्षी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करत असते; परंतु यावर्षी 'कोरोना' या रोगाच्या प्रादुर्भावामुळे माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करणे शक्य झाले नाही. शासनाच्या निर्देशानुसार महाविद्यालय नियमितपणे सुरू झाल्यावर लगेचच माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित केला जाईल.

**डॉ. राजेश देशपांडे**
समन्वयक
माजी विद्यार्थी संघटन

**डॉ. रतन चौधरी**
समन्वयक
अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

**डॉ.पुरुषोत्तम कालभूत**
प्राचार्य
श्रीकृष्णदास जाजू
ग्रामीण सेवा महाविद्यालय
पिपरी, (वर्धा)